महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ
कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे
सिंचन भवन, मंगळवार पेठ, बारणे रोड, पुणे- ४११०११
कार्यालय - (०२०) २६१२७३०९ / २६१२७०६२

दिनांक :- / /२०२२

जा.क्र.खपावि / बिसि / ५२४६ /सन २०२२

29 JUL 2022

प्रति,
सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला
मौजे भुगांव, ता. मुळशी, जि. पुणे.

विषय : सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला, मौजे भुगांव, ता. मुळशी, जि. पुणे या संस्थेस भुगांव ल. पा. तलावामधून पिण्यासाठी पाणी वापरास कायमस्वरूपी बिगरसिंचन पाणी आरक्षण मिळणेबाबत.

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य(धो), दि.१७.११.२०१६.
२) शासन निर्णय क्रं. बिसिंआ/२०२१/(१७९/२१)/सिंव्य(धो-२), दि. २४.०६.२०२२.
३) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे यांचे ज्ञापन पत्र जा. क्र मुअ(जसं)/ काअ-२/(२६/२०२१)/प्रशा-८/४२१७, दि.२५.०७.२०२२.

**सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला, मौजे भुगांव, ता. मुळशी, जि. पुणे** या गृहबांधणी प्रकल्पास मौजे भुगांव येथील गट क्रं. ४४ पै व इतर ३ मधील ३.०६५ हे. क्षेत्रावरील पिण्याच्या प्रयोजनाकरीता भुगांव ल. पा. तलावामधून पाणी वापरासाठीच्या प्रस्तावाला शासनाचे संदर्भ क्र.२ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. त्यानुषंगाने प्रदेश कार्यालयाने संदर्भ क्र. ३ अन्वये ज्ञापन निर्गमित केलेले आहे. सदरच्या ज्ञापनाच्या अधीन राहून सदरचे इरादापत्र देण्यात येत आहे. इरादापत्र दिल्यापासून ६ महिन्याच्या आत संस्थेने करारनामा करून योजना ३ वर्षाच्या आत कार्यान्वीत करणे संस्थेस बंधनकारक राहील.

**सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला, मौजे भुगांव, ता. मुळशी, जि. पुणे** या संस्थेस भुगांव ल. पा. तलावामधून पाणी उचलण्याचे प्रस्तावित आहे. सदर संस्थेस पिण्यासाठी ०.०८२८ दलघमी व औद्योगिक पाणी वापरासाठी ०.०० दलघमी अशी एकूण ०.०८२८ दलघमी/ वार्षिक आरक्षणास मंजूरी देण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | प्रयोजन | निव्वळ मागणी (दलघमी) | तूट १०% (दलघमी) | एकुण (दलघमी) | सिंचन क्षेत्र कपात (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिण्यासाठी | ०.०७५३ | ०.००७५ | ०.०८२८ | २३.४८ |
| | **एकुण** | **०.०७५३** | **०.००७५** | **०.०८२८** | **२३.४८** |

सदर संस्थेचे बिगर सिंचन आरक्षण खालील अटी व शर्तीनुसार मंजूर करण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती :-**

१) सदर संस्थेच्या पाणी आरक्षणामुळे १०.९७ हेक्टर सिंचन कपात होणार असून त्यापोटी **सिंचन पुनर्स्थापना खर्च(सन २०२२-२३ प्रमाणे) २३.४८ x २.२३ = रू. ५२.३६ लक्ष येत असून ते संस्थेस भरणे** बंधनकारक आहे.

**Bank Details-**

(Bank of Maharashtra, Sinchan Bhavan Branch
Acc of - Executive Engineer, Khadakwasla Irrigation Division,Pune
IFSC Code – MAHB0001798
Collection Acc - 60266798984 )

२) अर्जदार संस्था स्वखर्चाने संबंधित योजना कार्यान्वित करेल.

३) योजनेचे कामास प्रत्यक्ष सुरूवात करण्यापूर्वी जलसंपदा विभागाचे संबंधित कार्यकारी अभियंतांचे बरोबर शासन परिपत्रक क्र.बिपापु-१००१/(७१३/२००१)/सिं.व्य.(धो). दिनांक ११/६/२००३ सोबतच्या विहित मसुद्यानुसार करारनामा करावा लागेल. **करारनामा केल्यानंतरच पाणी परवाना मंजुरी कार्यान्वित होईल.**

४) संस्थेने आरक्षित केलेल्या पाण्यावर शासन निर्णयाच्या प्रचलित दराने पाणीपट्टी आकारण्यात येईल. शासनाने वेळोवेळी ठरवुन दिलेल्या पाणीपट्टीच्या दरानेच पाणी पुरवठयाची आकारणी केली जाईल आणि विहित मुदतीत ही पाणी आकारणी अर्जदार संस्थेने जलसंपदा विभागाकडील संबंधित कार्यालयामध्ये भरावी लागेल. पाणीपटटी आाकारणी ही एकुण पाणी वापरावर करण्यांत येईल.

५) योजनेत वापरलेल्या पाण्यातील काही भाग वापरानंतर दुषित स्वरूपात जलाशयांत / कालव्यात / नदीत सोडले न जाण्याची व्यवस्था अर्जदार स्वखर्चाने करेल व त्याबाबत अर्जदार पूर्णतः जबाबदार राहिल. अशाप्रकारे वापरलेल्या पाण्याची शुध्दीकरण व्यवस्था अर्जदार संस्थेने स्वखर्चाने करावी लागेल व त्याची विल्हेवाट लावण्याचे संदर्भात **महाराष्ट्र जलप्रदुषण मंडळाचे ना-हरकत प्रमाणपत्र करारनामा करण्यापूर्वी सादर करावे लागेल.**

६) **संस्थेने ३ वर्षाच्या आत मंजूर पाणी आरक्षणापैकी कमीत कमी २० टक्के पुनर्वापराचे पाणी उपलब्ध करुन घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी संस्थेने सांडपाणी शुध्दीकरण प्रक्रिया करणारी यंत्रणा बसवावी. तसेच याबाबतच्या सविस्तर प्रस्तावाची माहिती जलसपंदा/पर्यावरण विभागांस विहित करारनामा करतेवेळी देणे आवश्यक आहे.** अन्यथा पाणी आरक्षण आपोआप रद्द होईल. पुनर्वापराचे उर्वरित पाणी नदी/नाल्यात सोडल्यानंतर त्यावर जलसंपदा विभागाचा हक्क राहील. पुनर्वापराचे उपलब्ध पाणी संस्थेस परस्पर विल्हेवाट लावता येणार नाही.

७) जलस्त्रोत प्रदुषित करणा-या पाणी वापरकर्त्यांकडून दंडनीय पाणीपटटी आकारणी करणेबाबत मार्गदर्शक तत्वे शासन निर्णय. क्रमांक/पापव-२०१५/ (प्र.क्र.८८/२०१५)/ सिं.व्य. (महसूल), दि.२१.०४.२०१६ मधील अटीचे पालन करणे पाणी वापरकर्त्यांना बंधनकारक राहिल. व यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

८) ज्या जागेचा संस्थेने विकास केलेला आहे, त्या जागेतील इमारतीवरील व पेवमेंट केलेल्या मोकळया जागेवरील पावसाचे पाणी साठवण करावे (Rain water harvesting) आणि अशा पाण्याचा वापर भूजल पुनर्भरण व गार्डनिंग इत्यादीसाठी करण्यात यावा.

९) ही मंजुरी म्हणजे पाणी पुरवठयाची हमी नव्हे. नैसर्गिक किंवा इतर काही अपरिहार्य कारणांमुळे तलावात पाणी कमी पडल्यास मंजूर पाणी पुरवठयाबाबत शासन जबाबदार राहणार नाही. कमी पाणी उपलब्धतेच्या वर्षात त्या वर्षापुरती मंजूर पाणी पुरवठयात कपात करण्याचा अधिकार जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंतांना राहील. परिणामी कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. उदभव ठिकाणी पाण्याची कमतरता असल्यांस संस्थेस आरक्षित पाण्याची शाश्वती देता येणार नाही. बारमाही कालव्यावर १ महिना व आठमाही कालव्यावर ५ महिने पुरेल एवढया क्षमतेचा साठवण तलाव स्वखर्चाने बांधणे आवश्यक राहील.

१०) जलाशयातील / कालव्यातील पाण्याच्या दर्जा / गुणवत्तेबाबत जलसंपदा विभाग जबाबदार राहणार नाही, व त्यास जबाबदारही धरता येणार नाही.

११) पाणी जलाशय/कालवा/नदी मधून थेट उचलावे लागेल. तलावाचे निम्न पातळी तलांकापर्यंत पाणी जॅकवेलमध्ये घेण्याची व्यवस्था करावी लागेल व पाणी पुरवठयाचे तसेच योजनेच्या बांधकामाचे संबंधात आराखड्यास जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांची बांधकामापूर्वी पूर्व सहमती घ्यावी लागेल. व त्यास पाटबंधारे विभागाचे प्रचलित नियम तसेच शासन/महामंडळाने वेळोवेळी मंजूर केलेले नियम व अटी अर्जदार संस्थेवर बंधनकारक राहतील.

१२) जलमापनाची व जलमापन मीटर व्यवस्था संस्थेस स्वखर्चाने करावी लागेल व ती व्यवस्था वारंवार तपासण्याचा अधिकार शासनास राहील. ह्या व्यवस्थेवर आधारित पाणी वापराचा दैनंदिन अभिलेख संस्थेने ठेवावा हा अभिलेख शासनाचे अधिकारी केंव्हाही पाहू शकतील. हा अभिलेख नीट ठेवल्याचे दिसून न आल्यास प्रत्यक्षांत केलेल्या पाणी वापरासंबंधीचा अंदाज जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता ठरवतील व हा अंदाज अंतिम राहील व संस्थेवर तो बंधनकारक राहील.

१३) पाणीपट्टीची वसुली भविष्य काळात प्रभावीपणे होण्याचे दृष्टीने शासन व संबंधित संस्था यांचेमध्ये द्विपक्षीय करार करण्यात येईल.

**१४) संस्थेस "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण" यांचे "पाणी पुरवठा वितरणासाठी असलेले निकष" आदेश ०९/२०१७ दि. २२.०९.२०१७ व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे आदेश क्र. मजनिप्रा / २०२२ / ठो.ज.प्र.आ /२०२२ / २१२ दि. २९.०३.२०२२ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.**

१५) पाणीपटटी वेळेत भरली नाही तर, पाणी पुरवठा खंडीत करण्याचा अधिकार शासनास राहिल.

**१६) संस्थेने २ महिन्याची पाणीपटटी इतकी अनामत रक्कम रू. ९१३४/- (नउ हजार एकशे चौतीस रु.फक्त) शासनाकडे आगाऊ भरणे आवश्यक आहे.**

(Bank of Maharashtra, Sinchan Bhavan Branch
Acc of - Executive Engineer, Khadakwasla Irrigation Division,Pune
IFSC Code – MAHB0001798
Other Deposite Acc - 60162686508 )

१७) करारनामा करणेपूर्वी संस्थेने संपूर्ण थकबाकी भरणे आवश्यक आहे. स्काडा आधारित अल्ट्रासोनिक वॉटर मीटर बसविणे बंधनकारक आहे. तसेच जलमापन यंत्र बसविल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

सोबत :
संदर्भ क्र.२ व ३

जाप्रत **कार्यकारी अभियंता,**
**खडकवासला पाटबंधारे विभाग,पुणे**

**प्रत : मा. अधीक्षक अभियंता,** पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत :** सहाय्यक **अभियंता श्रेणी** -१, मुठा कालवे पाटबंधारे उपविभाग, पुणे यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

१) शासन परिपत्रक विपापु-१००१/(७१३/२००१)/सिं.व्य.(धो), दिनांक ११/६/२००३ मधील सूचनांनुसार उचित कार्यवाही करण्यात यावी.

२) करारनामा करणेपूर्वी संस्थेकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुदतवाढीचे प्रमाणपत्र मिळवून ते करारनाम्यास लावावे.

३) करारनाम्याचे नूतनीकरण करणेपूर्वी शासनाचे उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होणे महत्वाचे आहे.

४) पाणी परवाने हे शासनाचे/महामंडळाचे महसूल मिळवून देण्याचे साधन आहे. त्यामुळे महसूल वसुलीबाबत काटेकोरपणे व सतर्क राहणे अत्यंत महत्वाचे आहे.

सोबत : संदर्भ क्र.२ व ३

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे
सिंचन भवन, बारणे रस्ता, मंगळवार पेठ, पुणे- ४११०११
दूरध्वनी क्र.०२०-२६१२०५०५, २६१२५०९४.
Email ID cewrdpune@gmail.com

जा.क्र.मुअ(जसं)/काअ-२/(२६/२०२१)/प्रशा-८/ No - 4217 दिनांक : 25 JUL 2022

## ज्ञापन :

विषय : सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला मौ.भुगांव ता.मुळशी जि.पुणे या संस्थेस "गृहबांधणी प्रकल्पाच्या" प्रयोजनासाठी भुगांव ल.पा.तलाव प्रकल्पामधून घरगुती (पिण्यासाठी) पाणी वापरासाठी बिगर सिंचन मोठया प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) प्रस्तावास मंजूरी मिळणेबाबत...

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य(धो), दि.१७.११.२०१६
२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/(५११/१८)/सिंव्य(धो), दि.०१.१२.२०१८
३) शासन निर्णय क्रमांक बिसिंआ २०२१/(२७०/२१)/सिंव्य(धो-२), दि.२४.०६.२०२२
४) मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र क्रमांक मकृखोविम-५६/(३३५/२०२१)/सिंव्य-३/३५२९, दिनांक ०९.०८.२०२१
५) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे पत्र जा.क्र.मुअ(जसं)/काअ-२/(२६/२०२१)/प्रशा-८/३४८३, दि.३०.०७.२०२१
६) अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.पुपामं/बिसिंमशा/४७६१ दि.२७.०७.२०२१

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०११ यातील कलम ५ मधील १६ (क) (१) नुसार जलसंपत्ती प्रकल्पामधील पाण्याचे क्षेत्रीय वाटप राज्य मंत्रीमंडळ स्तरावरुन करण्याची तरतुद करण्यांत आली आहे. त्या तरतुदीनुसार संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये, राज्यातील पाटबंधारे प्रकल्पातून पिण्यासाठी १५% व औद्योगिकसाठी १०% व सिंचनासाठी ७५% क्षेत्रिय वाटप राज्य मंत्रीमंडळाने निर्धारित केले आहे.

संदर्भीय शासन निर्णय क्र.१ अन्वये, बिगर सिंचन मोठया प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्तावाना मंजुरी देण्यासाठी क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादेनुसार सुधारित स्तर निश्चित करण्यांत आलेले आहेत. त्यानिर्णयानुसार सदर प्रस्ताव शासन निर्णयामधील परिच्छेद २.३ मधील तरतुदीनुसार पिण्यासाठी व औद्योगिक पाणी वापराच्या बिगर सिंचन मोठया प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्तावांना मंजूरी देण्याचे अधिकार मा.मंत्रीमंडळ उपसमितीला देण्यांत आले आहेत

त्यानुसार, सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला मौ.भुगांव ता.मुळशी जि.पुणे या संस्थेच्या मौ.भुगांव येथील गट क्रमांक ४४ पै व इतर ३ मधील ३.०६५ हे. क्षेत्रावरील "गृहबांधणी प्रकल्पाच्या" प्रयोजनासाठी भुगांव ल.पा.तलाव प्रकल्पातून वार्षीक ०.०८२८ दलघमी बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजुरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावास शासनाने संदर्भीय पत्र क्रमांक ०३ अन्वये मंजुरी प्रदान केल्यानुसार प्रदेश कार्यालय त्याचे खालीलप्रमाणे सविस्तर **"ज्ञापन"** निर्गमित करीत आहे.

सदर संस्थेची सन २०५१ मधील घरगुती पाणीवापरासाठी ३४०० इतकी लोकसंख्या (कायमस्वरुपी ३१५०+ तरती २५०) गृहित धरुन घरगुती पाणी वापरासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे आदेश १०/२०१८ दि.२५.०६.२०१८ नुसार, विशेष नगर वसाहतींना अनुज्ञेय असलेल्या कायमस्वरुपी लोकसंख्येसाठी ९० व तरती लोकसंख्येसाठी ४५ लिटर/माणशी/दिन या निकषाच्या मापदंडा प्रमाणे घरगुती वापरासाठी एकुण मागणी ०.१०७६ दलघमी इतकी येत असून त्यामध्ये १०% वहनतुट गृहित धरुन एकुण ०.११८३ दलघमी व राज्याच्या जलनितीनुसार

३०% पाणी पुनर्वापर करणे आवश्यक असल्याने ते वगळून निव्वळ मागणी ०.०८२८ दलघमी इतकी बिगर सिंचन पाणी आरक्षण खालीलप्रमाणे मंजूर करण्यांत आले आहे.

| संस्थेचे नांव | स्त्रोत | उदभव | पाणी वापराचा प्रकार | एकुण (दलघमी) | सिंचन क्षेत्र कपात (हे.) |
|---|---|---|---|---|---|
| सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला मौ.भुगांव ता.मुळशी जि.पुणे | भुगांव ल.पा.तलाव | भुगांव जलाशयातून | घरगुती (पिण्यासाठी) | ०.०८२८ | २३.४८ |

* अट क्र. १९ नुसार, सिंचन क्षेत्र कपातीपोटी सिंचन पुन:र्स्थापनेचा खर्च घेण्यांत यावा.

**बिगर सिंचन आरक्षण खालील अटी व शर्तीनुसार मंजूर करण्यांत येत आहे.**

१) सदर संस्थेस शासनाने / महामंडळाने मंजूर केलेल्या बिगर सिंचन आरक्षणातील शासन निर्णय / महामंडळाच्या ज्ञापनातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

२) सदर संस्था पाणी उचलण्याची पाणी पुरवठा योजना स्वखर्चाने कार्यान्वित करेल.

३) योजनेच्या कामास प्रत्यक्ष सुरूवात करण्यापूर्वी जलसंपदा विभागाचे संबंधित कार्यकारी अभियंता बरोबर बिगर सिंचन पाणीपुरवठयासाठी "करारनाम्याचा प्रचलित नमुना व मार्गदर्शक तत्वे", महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र.बिपापु १००१/(७१३/२००१)/सिं.व्य.(धो), दिनांक ०७/०४/२००३ व ११/०६/२००३ अन्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार करारनामा करण्यात यावा. करारनामा केल्यानंतरच पाणी परवाना मंजुरी कार्यान्वित होईल.

४) पाणीपट्टीची वसुली भविष्य काळात प्रभावीपणे होण्याचे दृष्टीने शासन व संबंधित संस्था यांचेमध्ये द्विपक्षीय करार करण्यात येईल.

५) घरगुती, औद्योगिक व कृषी सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणा-या पाण्यासाठी ठोक जलदराबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे पत्र जा.क्र.मजनिप्रा/२०२२/ठोजप्रआ/२०२२/२१२, दि.३०.३.२०२२ नुसार कार्यवाही करण्यांत यावी. संस्थेने विहित मुदतीत पाणीपटटी जलसंपदा विभागाकडे भरावी लागेल. पाणीपटटी आकारणी ही एकुण वार्षीक पाणी वापरावर आकारण्यांत येईल, जर पाणीपटटी वेळेत भरली नाही, तर पाणी पुरवठा खंडीत करण्याचा अधिकार जलसंपदा विभागास राहिल.

६) जलसंपदा विभाग जलस्त्रोत प्रदुषित करणा-या पाणी वापरकर्त्याकडून दंडनीय पाणीपटटी आकारणी करणेबाबत मार्गदर्शक तत्वे या विषयाबाबत महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन निर्णय, क्रमांक पापव-२०१५/ (प्र.क्र.८८/२०१५)/सिं.व्य.(महसूल), दि.२१.०४.२०१६ मधील अटीचे पालनकरणे पाणी वापरकर्त्यावर बंधनकारक राहिल. व यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. पाणीवापर करणारी संस्था महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन करण्यास अपयशी ठरल्यास त्याचा पाणी पुरवठा बंद करण्यांत येईल.

७) संस्थेने ३ वर्षाच्या आत मंजूर पाणी आरक्षणापैकी कमीत कमी ३० टक्के पुनर्वापराचे पाणी उपलब्ध करुन घेणे बंधनकारक आहे. त्यासाठी संस्थेने सांडपाणी शुध्दीकरण प्रक्रिया करणारी यंत्रणा बसवावी. तसेच याबाबतच्या सविस्तर प्रस्तावाची माहिती जलसपंदा / पर्यावरण विभागांस विहित करारनामा करतेवेळी देणे आवश्यक आहे. अन्यथा पाणी आरक्षण आपोआप रद्द होईल.

८) प्रक्रिया केलेले सांडपाणी कालव्यात/ नैसर्गिक नदी नाल्यामध्ये आल्यास अश्या पाण्याचे विनियमन महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ च्या कलम ११ (१) नुसार करण्यात यावे. अशा पाण्याच्या वापरासाठीचे दर वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या दरानुसार आकारण्यात येतील.

९) ज्या जागेचा संस्थेने विकास केलेला आहे, त्या जागेतील इमारतीवरील व पेवमेंट केलेल्या मोकळया जागेवरील पावसाच्या पाण्याचे भूजल पुनर्भरण करणे (Rain water harvesting) आणि पुनर्वापराद्वारे (Recycling) अशा पाण्याचा वापर गार्डनिंग इत्यादीसाठी करण्यात यावा.

१०) ही मंजुरी म्हणजे पाणी पुरवठयाची हमी नव्हे. नैसर्गिक किंवा इतर काही अपरिहार्य कारणांमुळे तलावात पाणी कमी पडल्यास मंजूर पाणी पुरवठयाबाबत शासन जबाबदार राहणार नाही. कमी पाणी उपलब्धतेच्या वर्षात त्या वर्षापुरती मंजूर पाणी पुरवठयात कपात करण्याचा अधिकार जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंतांना राहील. परिणामी कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची जबाबदारी शासनावर राहणार नाही. तसेच उदभव ठिकाणी पाण्याची कमतरता असल्यास संस्थेस आरक्षित पाण्याची शाश्वती देता येणार नाही.

११) जलाशयातील / कालव्यातील पाण्याच्या दर्जा / गुणवत्तेबाबत जलसंपदा विभाग जबाबदार राहणार नाही, व त्यास जबाबदारही धरता येणार नाही.

१२) संस्थेस उपलब्ध पाणी जलाशय / कालवा / नदी मधून थेट उचलावे लागेल. तलावाचे निम्न पातळी तलांकापर्यंत पाणी जॅकवेलमध्ये घेण्याची व्यवस्था करावी लागेल व पाणी पुरवठयाचे तसेच योजनेच्या बांधकामाचे संबंधात आराखड्यास जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांची बांधकामापूर्वी पूर्व सहमती घ्यावी लागेल. व त्यास जलसंपदा विभागाचे प्रचलित नियम तसेच शासन / महामंडळाने वेळोवेळी मंजूर केलेले नियम व अटी अर्जदार संस्थेवर बंधनकारक राहतील.

१३) पाणी आरक्षण मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा संस्थेने जलमापन यंत्र बसविल्यानंतर दिला जाईल. स्काडा आधारित अल्ट्रासोनिक प्रवाह मीटर सर्वांना बसविणे अनिवार्य आहे. जर मीटर मध्ये बिघाड / ना दुरुस्त / काम करीत नसल्याचे आढळून आल्यास, जलसंपदा विभागामार्फत शेवटची तपासणी केलेल्या तारखेपासून दंडनीय दराने बिलाची आकारणी केली जाईल

१४) खाजगी संस्था / औद्योगिक संस्थेने वेगवेगळया विगतवारीसाठी एकच वॉटर मीटर बसविल्यास त्याच्या परिसरात वापरलेल्या सर्व पाण्याची आकारणी औद्योगिक दराने पाणीवापर म्हणून गृहित धरला जाईल. तथापि जर संस्थेने विगतवारीप्रमाणे वेगळी वॉटर मीटर बसविण्याची व्यवस्था केली असेल तर आशा प्रत्यक्ष पाणीवापराप्रमाणे पाणीपटटी आकारणी लागू केली जाईल.

१५) संस्थेने १ महिन्याच्या आत योजना कार्यान्वीत होण्यापूर्वी स्वखर्चाने जलमापन यंत्र बसविण्याची व्यवस्था करावी. संस्थेने विहित वेळेत मीटरची व्यवस्था न केल्यास विभागीय कार्यालयाने जलमापन यंत्रणेच्या अनामत ठेव रक्कमेतून जलमापन यंत्र बसविण्याची कार्यवाही करावी. त्यासाठी कमी / अधिक रक्कम लागल्यास बिगर सिंचन देयकामध्ये वळती करावी. प्रत्यक्ष जलमापन यंत्र बसविल्याशिवाय योजना कार्यान्वीत करण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

१६) जलमापनाची व जलमापन मीटर व्यवस्था तपासण्याचा अधिकार शासनास राहील. ह्या व्यवस्थेवर आधारित पाणी वापराचा दैनंदिन अभिलेख संस्थेने ठेवावा हा अभिलेख शासनाचे अधिकारी केंव्हाही पाहू शकतील. हा अभिलेख नीट ठेवल्याचे दिसून न आल्यास प्रत्यक्षांत केलेल्या पाणी वापरासंबंधीचा अंदाज जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता ठरवतील व हा अंदाज अंतिम राहील व संस्थेवर तो बंधनकारक राहील.

१७) बारमाही कालवा उद्‌भव असेल तर २ महिने व आठमाही [illegible]
साठवण क्षमतेचा तलाव स्वखर्चाने बांधणे आवश्यक राहील. तसेच नदी अपरिहार्य उद्‌भव असेल तर ज्या नदीत सिंचनासाठी बारमाही पाणी सोडले जाते, त्या नदीवरील पाणी पुरवठा योजनेसाठी १ महिन्याच्या गरजेएवढी साठवण क्षमता व इतर नद्याबाबत मात्र ६ महिन्यांच्या गरजेएवढी साठवण क्षमता असणारा तलाव बांधणे आवश्यक राहील. तसेच कोणत्याही परिस्थितीत वरील धरणातून पाणी सोडले जाणार नाही.

१८) संस्थेने २ महिन्याची पाणीपटटी इतकी अनामत रक्कम शासनाकडे आगाऊ भरणे आवश्यक आहे. व जलमापन यंत्रासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण याच्या प्रचलित दरसुचीनुसार दर + १५% अतिरिक्त कार्यालयीन खर्च इतकी परिगणित रक्कम अनामत ठेव स्वरुपात करारनामा करतेवेळी जमा करावी.

१९) सदर पाणी आरक्षण मंजुरीमुळे होणा-या सिंचन कपातीपोटी सिंचन पुन:स्थापनेचा खर्च शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २००८/(१३१/०८)/सिंव्य(धो), दि.६.३.२००९ नुसार, रु. १ लक्ष प्रति हेक्टर प्रमाणे (Base year २००९) व शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१३/(४१५/२०१३)/सिंव्य(धो), दि.१६.८.२०१४ नुसार, प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असलेला शासनाचा प्रचलित दर अथवा भाववाढ निर्देशांक (Cost inflation index) विचारात घेऊन यापैकी जो जास्त असेल त्या दराने सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च शासनाकडे / महामंडळाकडे करारनामा करण्यापूर्वी जमा करण्यात यावा.

तसेच, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१३/(४१५/२०१३)/सिंव्य(धो), दि.१६.८.२०१४ नुसार ग्रामपंचायत / जिल्हा परिषद / पंचायत समित्या / नगरपालिका / कटक मंडळे (contonment board) / नगर पंचायत या सर्व संस्था आर्थिक दृष्टा सक्षम नसल्याने त्याच्यांकडुन पिण्यासाठी पाणी आरक्षण प्रकरणात सिंचन पुनर्स्थापनेचा खर्च माफ करण्यांत आला आहे.

त्याच धर्तीवर, शासन निर्णय (नगरविकास विभाग) क्रमांक संकीर्ण २०१५/प्र.क्र.२७४/नवि-३३, दि.१७.१२.२०१६ नुसार राज्यातील "क" व "ड" वर्ग महानगरपालिकांकडून आकारण्यांत येणारा सिंचन पुन:स्थापना खर्च माफ करण्यांत आला आहे.

२०) प्रदेश कार्यालयाने "ज्ञापन" निर्गमित केल्यानंतर संस्थेस इरादपत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) देण्यात यावे, त्यामध्ये सुरवातीला करारनामा करण्यांची मुदत ६ महिने ठेवावी. तसेच बिगर सिंचन पाणीवापराचे करारनामे करणे व करारनाम्याचे नुतनीकरण वेळेवर करणेबाबत याबाबत महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, परिपत्रक क्रमांक, पापव-२०१५/(प्र.क्र.४००/२०१५)/सिंव्य(महसुल), दि.१५.१२.२०१५ नुसार मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार वेळोवेळी निर्गमित होणा-या शासन निर्णय / परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

२१) सदर संस्थेला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे "पाणी पुरवठा वितरणासाठी असलेले निकष" आदेश-०९/२०१७ दि.२२.०९.२०१७ व "ठोक जलदराचे पुर्नविलोकन व सुधारणा" आदेश-०१/२०१८ दि.११.०१.२०१८ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील

२२) पाणी कमी उपलब्धतेच्या कालावधी दरम्यान, पाणी वापराच्या प्रमाणामध्ये येणारी तूट वापरकर्तेच्या भिन्न श्रेणीं मध्ये विभागली जाईल. तथापि, असे करताना, घरगुती आणि औद्योगिक क्षेत्रांना जास्तीत जास्त अनुज्ञेय कपात अनुक्रमे २५% व ५०% असेल. अशाप्रकारे घरगुती बल्क वॉटर यूझरर्स आणि इंडस्ट्रियल बॉल्क वॉटर यूझरर्स साठी अनुक्रमे ७५% व ५०% कमीतकमी पाणीवाटप शासनाने निर्धारित केला आहे. त्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे आदेश ९/२०१७ दि.२२.९.२०१७ मधील मुद्या क्र. ८ प्रमाणे कार्यवाही करावी.

२३) अधिनियमाच्या कलम ११ (q) च्या तरतुदीनुसार सर्व नगरपालिका, महानगरपालिका आणि महानगरीय शहरांसाठी जल नियोजन आणि वार्षिक लेखापरिक्षण प्रकाशित करणे प्राधिकरणाने अनिवार्य केलेले आहे. तसेच मुख्य लेखापरीक्षक, जल व जलसिंचन, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद यांच्याकडून जललेखा परीक्षण करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत ग्राहकाची आहे. सदरचे ऑडिट रिपोर्ट जलसंपदा विभागाकडे आणि प्राधिकरणला सादर करावा.

२४) व्यापारी संस्था / खाजगी वसाहती / नागरी वसाहती (Townships) साठी बांधकाम चालू असे पर्यंत वापरलेल्या पाण्याकरिता औद्योगिक (प्रक्रिया) दराने पाणीपटटी आकारण्यात यावी व बांधकाम पूर्ण झाल्यावर (वापर परवाना मिळालेनंतर) होणा-या पाणीवापरासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचे पत्र जा.क्र. मजनिप्रा/२०२२/ठोजप्रआ/२०२२/२१२, दि.३०.३.२०२२ परिच्छेद २ मधील मुद्या (३) नुसार पाणीपटटी आकारणी करावी, अथवा वेळोवेळी निर्गमित होणा-या MWRRA / शासन निर्णयानुसार आकारणी करावी. दोन्ही वापर एकाच वेळी चालू असल्यास त्यासाठी वेगवेगळे मीटर बसवावेत व त्यानुसार आकारणी करावी.

२५) सदर करारनामा जास्तीत जास्त सहा वर्षासाठी वैधता राहील. करारनामा कालावधीत MWRRA ने बनवलेले हक्क, निर्धारित अटी आणि नियम दरप्रणालीतील बदल पाणी वापरकर्ता संस्थेस बंधनकारक राहतील.

२६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१०/(४०७/१०)/सिंव्य(धो), दि.२९.०६.२०११ अन्वये करारनामा करताना बिगर सिंचन पाणीवापर कर्ते अंतिम पाणी मागणीप्रमाणे टप्पाटप्याने पाणीवापर करण्याचे नियोजन नमुद करु शकतील. त्याप्रमाणे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश क्रमांक ०१/२०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२७) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१८/(५११/१८)/सिंव्य(धो), दि.१.१२.२०१८ नुसार, पाणी आरक्षण व्याख्या व व्याप्ती निश्चित केली आहे. त्यामध्ये पाणी आरक्षण ऐवजी पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) ही संज्ञा निश्चित केली आहे. पाण्याचा हक्क मंजूरी देतांना पुढील ३० वर्षाचा कालावधी विचारात घेऊन भविष्यकालीन पाण्याची गरज परिगणित केली जाते. व त्यानुसार आरक्षण परिमाण काढले जाते. तथापि हे परिमाण म्हणजे पाण्याचा दर वर्षीचा हक्क असे समजून त्याचा वापर करण्याचा व दरवर्षी पाणी नियोजन त्याप्रमाणे करण्याचा कल असतो. वास्तविक हा समज चुकीचा आहे. पाण्याचा हक्क हे वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात दरवर्षी हे आरक्षणाच्या परिमाण वाढत जाणे अपेक्षीत आहे. पुढील परिच्छेदानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

"This reservation is only the letter of support for the, water supply scheme or the industry as the case may be. Actual quantity of water that will be supplied every year shall be governed by the entitlement granted to the water user entity by the River Basin Agency based on the population and the reasonable use norm decided by this Authority and the yearly allocation declared by the prescribed Authority on the basis of reservoir contents of the year and shall be subjected to various provisions in the agreement that will be signed by the water user entity with River basin Agency"

२८) घरगुती पाणी वापरास कायमस्वरुपी परवाना देण्यात यावा. औद्योगिक संस्थामध्ये काळाच्या ओघात मोठया प्रमाणात बदल होत असतात. त्याची मालकी, उत्पादन प्रकारातील बदल, विस्तारीकरण इत्यादीमुळे त्यांचे सर्वसाधारण पाणी आरक्षणाकरीता परवान्यांची मुदत २५ वर्षासाठी करुन त्यानंतर आवश्यकतेप्रमाणे त्यांचे नुतीनकरण करण्यात यावे.

२९) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१२/(प्र.क्र.२०/२०१२)/सिंव्य(म), दि.०८.०३.२०१८ अन्वये, "धरणाच्या जलाशयाच्या व पायथ्यालगतच्या अंतराच्या निषेध क्षेत्र" व शासन परिपत्रक क्र.पूननि २०१८/(१८२/२०१८)/सिंव्य(म), दि.०३.०५.२०१८, "निषेधक पूररेषा (Blue Line) / नियंत्रक पूररेषा (Red Line) मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार" व प्रचलित शासन निर्णयानुसार, अशा बांधकामाना बिगर सिंचन पाणीवापर लागू राहणार नाही.

३०) कालवातून पाणी उचलण्याचे प्रस्तावित असल्यास सिंचन आवर्तन कालावधी व्यतिरिक्त इतर कोणत्याही वेळेस अतिरिक्त पाणी सोडण्यांची मागणी करता येणार नाही.

३१) संस्थेने ज्ञापनाच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या आत योजना पुर्ण करुन मंजूर पाणी आरक्षणाप्रमाणे पाणीवापर केला पाहिजे, तसे न केल्यास ३ वर्षानंतर सदर पाणी परवाना आपोआप रद्द होईल, याबाबतची नोंद घ्यावी.

३२) सदर पाणी मंजुरीच्या अनुषंगाने पिण्याच्या प्रयोजनार्थ पाणी वापर करतांना उपलब्ध करुन दिलेल्या पाण्याची गुणवत्ता पिण्यास योग्य (potable) करण्याकरीता आवश्यक उपाययोजना करण्याची जबाबदारी ही संस्थेची राहील.

३३) कायमस्वरुपी पाणीकोटा कमी करणे, नावात बदल करणे, मुळ करारनामा नुतनीकरण करणे इत्यादी बाबतची कार्यवाही संपूर्ण पाणीपट्टी थकबाकी भरल्यानंतर करण्यांत येईल.

३४) संस्थेकडील पुर्वीची सिंचन / बिगर सिंचन थकबाकी प्रलंबित असल्यास ती संपूर्ण रक्कम भरल्यानंतरच करारनामा पूर्ण करण्याची कार्यवाही करावी.

३५) सदरचे आदेश करारनामा झाल्यापासून अंमलात येतील.

३६) सदरचे ज्ञापन हा करारनामाचा भाग राहील.

**सोबत**- संदर्भ क्र.३ ची प्रत

**मुख्य अभियंता (जसं),**
**जलसंपदा विभाग,पुणे**

**प्रत :** **मा.सचिव (जसंव्य व लाक्षेवि)**, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत :** **मा.कार्यकारी संचालक**, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.

**प्रत :** **अधीक्षक अभियंता**, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

**प्रत :** **कार्यकारी अभियंता**, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

१) शासन परिपत्रक विपापु-१००१/(७१३/२००१)/सिं.व्य.(धो), दिनांक ११.०६.२००३ व ०७.०४.२००३ प्रचलित नियमानुसार बिगर सिंचन करारनामा करण्याची उचित कार्यवाही करण्यात यावी.

२) करारनामा करणेपूर्वी संस्थेकडून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रमाणपत्र मिळवून ते करारनाम्यास लावावे.

३) करारनाम्याचे नूतनीकरण करणेपूर्वी शासनाचे उपरोक्त अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन होणे महत्वाचे आहे.

४) पाणी परवाने हे शासनाला महसूल मिळवून देण्याचे साधन आहे. त्यामुळे महसूल वसुलीबाबत काटेकोरपणे व सतर्क राहणे अत्यंत महत्वाचे आहे.

**प्रत :-** बृहत धारिका. सन २०२२ करीता.

सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला मौ. भुगांव ता मुळशी, जि. पुणे संस्थेस "गृहबांधणी प्रकल्पाच्या" प्रयोजनासाठी भुगांव ल.पा. प्रकल्पामधून घरगुती वापरासाठी बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement).

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक. बिसिंआ २०२१/(१७९/२१)/सिं.व्य.(धो-२)
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४/०६/२०२२

संदर्भ : -१) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे पत्र दि.९/०८/२०२१
२) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१३/(४१५/१३)/सिंव्य (धोरण) दि. १६/८/२०१४
३) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१५/(४४/१५)/सिंव्य (धोरण) दि. १७/११/२०१६
४) शासन निर्णय क्र. देवदु २०१५/(८३६/१५)/सिंव्य (कामे) दि. १७/११/२०१६
५) शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१८/(५११/१८)/सिंव्य (धोरण) दि. ०१/१२/२०१८
६) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २००८/(११३/०८) सिंव्य (धोरण) दि. ०६/०३/२००९

**प्रस्तावना:-**

संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचेकडून **सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला मौ. भुगांव ता मुळशी , जि. पुणे** या संस्थेस भुगांव प्रकल्पामधून "गृहबांधणी प्रकल्पाच्या " प्रयोजनासाठी बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्कास (Bulk Water Entitlement) मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी क्षेत्रिय वाटपाच्या मर्यादेनुसार सुधारित स्तर निश्चित करण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२.३ मधील तरतुदीनुसार पिण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार मा.मंत्रीमंडळ उप समितीला देण्यात आले आहेत. याअनुषंगाने शासनास प्राप्त झालेल्या खालील प्रस्तावास मंजुरी देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते .

**शासन निर्णय :-**

१.० मा. मंत्री, जलसंपदा यांचे अध्यक्षतेखाली दि. २१/०६/२०२२ रोजी संपन्न झालेल्या मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार व सदर बैठकीच्या मंजूर इतिवृत्तानुसार खालील तक्त्यातील रकाना क्र. २ मध्ये नमूद संस्थेला त्यांचे नावासमोर रकाना क्र.५ मध्ये नमूद मोठ्या प्रमाणात पाण्याच्या (Bulk Water Entitlement) हक्कास,परिच्छेद २.० मधील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

| अनु.क्र | संस्थेचे नांव | पाणी वापराचा प्रकार | जलाशय/कालवा/ नदीचे नांव | मंजूर केलेले मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) (दलघमी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सांकला बिल्डकॉन तर्फे साहील सांकला मौजे भुगांव ता. मुळशी, जि. पुणे | घरगुती | भुगांव ल.पा. प्रकल्पामधून | ०.०८२८ |

२.० उपरोक्त नमूद प्रस्तावास खालील अटींच्याअधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर पाणी आरक्षण मंजुरी मुळे होणाऱ्या सिंचन क्षमतीपोटी सिंचन पुर्नरथापनेचा खर्च शासन परिपत्रक क्र. संकिर्ण -२००८/(१३१/०८) सिंव्य(धोरण), दि. ०६/०३/२००९ नुसार रु. १ लक्ष प्रति हेक्टर प्रमाणे (Base Year २००९) अधिक भाववाढ निर्देशांक (Cost Inflation Index) विचारात घेऊन येणारी रक्कम अथवा प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी लागू असलेला शासनाचा प्रचलित दर यापैकी जो जास्त असेल त्या दराने सिंचन पुर्नरस्थापनेचा खर्च करारनामा करणेपुर्वी संस्थेकडून घेण्यात यावा .

२. बिगर सिंचन पाणी पुरवठयासाठी करारनाम्याचा सुधारीत नमुना व मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग शासन परिपत्रक क्र. बिपापू १००१/(७१३/२००१)/सिंव्य(धो), मुंबई- ३२, दि. ७/४/२००३ अन्वये निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार करारनामा करण्यात यावा .

३. शासन परिपत्रक क्र. पापव -२०१५६/(प्र.क्र.४००/२०१५)/सिव्य (महसूल) दि.१५/१२/२०१५ अन्वये बिगरसिंचन पाणी पाणीवापराचे करारनामे करणे व नुतनीकरण वेळेवर करणे बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. जलस्त्रोत प्रदुषित करणाऱ्या पाणी वापरकर्त्याकडून दंडनीय पाणीपट्टी आकारणी करणेबाबत मार्गदर्शक तत्वे या विषयाबाबत शासन निर्णय क्र. पापव २०१५/(प्र.क्र.८८/२०१५)/सिंव्य (महसूल) दि. २१/४/२०१६ मधील अटींचे पालन करणे पाणी वापरकर्त्यांना बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१०/(४०७/१०)/सिंव्य (धोरण), दि. २९/६/२०११ अन्वये करारनामा करताना बिगरसिंचन पाणीवापरकर्ते अंतिम पाणी मागणी प्रमाणे टप्प्याटप्प्याने पाणीवापर करण्याचे नियोजन नमुद करु शकतील. त्याचप्रमाणे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे आदेश क्र .१/२०१८ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी .

६. शासन निर्णय क्र. देवदु २०१५/(८३६/२०१५)/सिंव्य (कामे), दि. १७/११/२०१६ अन्वये पाटबंधारे विकास महामंडळाच्या अधिनियमातील तरतुदीनुसार सिंचन प्रकल्पांचे व्यवस्थापन पाटबंधारे महामंडळाकडे वर्ग करणे व पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास मान्यता देणेसाठीचा निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

७. पाणी उचलण्याची/ पुरवठ्याची जागा व क्षेत्रीय परिस्थितीनुसार इतर अटी शर्तीचा अंतर्भाव करून संबधित मुख्य अभियंता यांनी सविस्तर ज्ञापन तात्काळ निर्गमित करावे .

8. "This reservation is only the letter of support for the, water supply scheme or the industry as the case may be. Actual quantity of water that will be supplied every year shall be governed by the entitlement granted to the water user entity by the River Basin Agency based on the population and the reasonable use norm decided by this Authority and the yearly allocation declared by the prescribed Authority on the basis of reservoir contents of the year and shall be subjected to various provisions in the agreement that will be signed by the water user entity with River basin Agency."

९. सदर पाणी मंजुरीच्या अनुषंगाने पिण्याच्या प्रयोजनार्थ पाणी वापर करताना उपलब्ध करुन दिलेल्या पाण्याची गुणवत्ता पिण्यास योग्य (potable) करण्याकरिता आवश्यक उपाययोजना करण्याची जवाबदारी उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र. २ मध्ये नमुद संस्थेची राहील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०६२४१७२८४२०७२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vaijnath
Manmathappa Chille

(वैजनाथ चिल्ले)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा.राज्यपालांचे यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री ,यांचे सचिव.
४. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५. मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
८. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव.
९. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०. सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई.
११. अ.मु. सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सचिव,(प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ , पुणे
१५. मुख्य अभियंता (पा) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे
१७. अधीक्षक अभियंता , पुणे पाटबंधारे मंडळ , पुणे
१८. निवडनस्ती कार्यासन सिंव्य (धोरण).